महाराष्ट्र शासन

# महाराष्ट्र लोकसेवा आयोग

मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☏२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☏२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

क्रमांक:-डब्ल्यूईबी-१०२०/सीआर-२६/२०२१/मा.तं. दिनांक:- २४ जानेवारी, २०२२

## -: प्रसिध्दीपत्रक:-

**विषय:-महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित गट ब संयुक्त पूर्व परीक्षा २०२१-पोलीस उपनिरीक्षक संवर्गासाठी अर्ज सादर करण्याबाबत**

संदर्भ:- (१) जाहिरात क्रमांक २४९/२०२१, दिनांक २८ ऑक्टोबर, २०२१
(२) आयोगाचे दिनांक २७ डिसेंबर, २०२१ रोजीचे प्रसिध्दीपत्रक

महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित गट ब संयुक्त पूर्व परीक्षा २०२१ करीता शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एसआरव्ही-२०२१/प्र.क्र.६१/कार्या.-१२, दिनांक १७ डिसेंबर २०२१ अन्वये नव्याने पात्र ठरलेल्या व पूर्वी अर्ज सादर करु न शकलेल्या उमेदवारांना संदर्भीय दिनांक २७ डिसेंबर, २०२१ रोजीच्या प्रसिध्दीपत्रकाद्वारे अर्ज सादर करण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली होती. तथापि, दिनांक २८ ऑक्टोबर, २०२१ रोजीच्या जाहिरातीस अनुसरुन सहायक कक्ष अधिकारी व/अथवा राज्यकर निरीक्षक संवर्गासाठी अर्ज सादर केलेल्या परंतु पोलीस उपनिरीक्षक संवर्गाकरीता वयाधिक ठरल्यामुळे अर्ज सादर करु न शकलेल्या उमेदवारांकरीता अर्ज सादर करण्याची/पर्याय निवडीची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली नव्हती. यास्तव, अशा उमेदवारांना प्रस्तुत परीक्षेतील पोलीस उपनिरीक्षक संवर्गाकरीता अर्ज सादर करणे/पर्याय निवडण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

२. पोलीस उपनिरीक्षक पदासाठी अर्ज करण्याकरीता पात्र उमेदवारांना त्यांच्या खात्यामधील 'My Account' या सदरामधून प्रस्तुत परीक्षेच्या अर्जाच्या संक्षिप्त तपशीलासमोरील 'View' पर्याय निवडल्यानंतर उजव्या बाजूला उपलब्ध होणा-या 'Re-Check Eligibility' या लिंकद्वारे पोलीस उपनिरीक्षक संवर्गासाठी अर्ज /पर्याय सादर करता येईल.

३. पोलीस उपनिरीक्षक पदाकरीता अर्ज सादर करणे/पर्याय निवडण्याची सुविधा दिनांक २४ जानेवारी, २०२२ रोजी १८.०० वाजल्यापासून ते दिनांक ३० जानेवारी, २०२२ रोजी २३.५९ वाजेपर्यंत या कालावधीत सुरु राहील.

४. विहित कालावधीत व विहित पध्दतीने पोलीस उपनिरीक्षक संवर्गाकरीता अर्ज/पर्याय निवडण्याची प्रक्रिया न करणा-या उमेदवारांचा पोलीस उपनिरीक्षक पदाच्या निकाल प्रक्रियेकरीता विचार करण्यात येणार नाही.

सहसचिव, माहिती तंत्रज्ञान
महाराष्ट्र लोकसेवा आयोग